Thirumalai Chemicals Ltd

Registered Office:
"THIRUMALAI HOUSE",
Plot No. 101-102, Road No. 29,
Sion (East), Mumbai – 400 022, India
PHONE: +91 – 22– 43686200
FAX +91 – 22 – 24011699
E- MAIL: thirumalai@thirumalaichemicals.com
Website: www.thirumalaichemicals.com

(AN ISO 9001, 14001, 50001/ HACCP & FSSC 22000 CERTIFIED COMPANY)
CIN: L24100MH1972PLC016149

November 10, 2025

To,

The National Stock Exchange of India Limited
Listing Department
Exchange Plaza, Bandra Kurla Complex
Bandra (East)
Mumbai 400 051
Scrip code: TIRUMALCHM

BSE Limited
Department of Corporate Services
Floor 25, Phiroze Jeejeebhoy Towers
Dalal Street
Mumbai 400 001
Scrip code: 500412

Dear Sir/ Ma'am,

Sub.: Disclosure under Regulation 30 and 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ('SEBI LODR') – Newspaper Advertisement.

In compliance with the provisions of Regulation 30 and Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, as amended from time to time, please find enclosed the copies of newspaper advertisements published in 'Economic Times' (English) and 'Maharashtra Times' (Marathi) on November 10, 2025 (Monday), with respect to the Un-audited Financial Results for the quarter/half year ended September 30, 2025.

This is for your information and record.

Thanking you,

Yours faithfully,

For Thirumalai Chemicals Limited

Aditya Sharma
Digitally signed by Aditya Sharma
Date: 2025.11.10 15:41:53 +05'30'

Aditya Sharma
Company Secretary & Compliance officer

Clock Ticks as COP30 Negotiators Struggle to Agree on Agenda

Emissions and finance disputes threaten to delay the start of talks

Urmi Goswami

Belem, Brazil: Negotiators from nearly 200 countries have been arriving in the Amazonian city of Belem in northeast Brazil for the 30th UN climate conference (COP30), which opens on Monday. They now have less than a day to avoid a rocky start by finding a compromise on whether to formally include discussions on accelerating greenhouse gas emission reductions and on the obligation of developed countries to provide resources to developing nations to enable more ambitious climate action.

Despite several rounds of consultations led by the COP30 presidency, differences remain on how these two broad issues should be reflected in the formal agenda for the two-week conference. Substantive negotiations cannot begin until the agenda is agreed.

The draft COP30 agenda includes key items related to adaptation, gender and climate, just transitions, and implementation of the 2023 global stocktake outcomes. However, it does not currently include formal discussions on scaling up emission reductions consistent with limiting warming to 1.5°C, nor on assessing the impact of existing mitigation efforts. It also does not provide for structured engagement on financial support from developed to developing countries — support considered essential for climate action in the Global South.

A tourist poses with the COP30 mascot at Estação das Docas in Belém

Four proposals have been submitted to address this gap, and a decision on their inclusion will be taken during the COP30 opening plenary. Last week, the European Union proposed a structured discussion on countries' biennial transparency reports (BTRs), which track implementation of national climate targets. This would help identify effective approaches and barriers. The EU proposal complements that of the small island states, which call for dedicated discussions on the UNFCCC NDC synthesis report to assess collective progress toward the 1.5°C limit and define follow-up actions through 2030.

Two further proposals, focused on support for developing countries, have been submitted by the Like-Minded Developing Countries (LMDC) group — which includes China, India, Saudi Arabia, Egypt and Bolivia. The LMDC seeks a dedicated discussion on the obligations of developed countries to provide public finance, and another on unilateral trade measures such as the EU's Carbon Border Adjustment Mechanism (CBAM), which they argue imposes burdens on developing countries without accompanying support.

The divergence does not fall neatly along developed–developing lines. Small island states prioritise rapid emissions cuts to keep 1.5°C within reach. The LMDC argues that such discussions risk creating a top-down approach inconsistent with nationally determined targets.

For the EU — balancing internal politics and competitiveness concerns — an outcome that does not address emissions efforts by major developing economies would be politically difficult.

The Brazilian COP30 presidency argues that the proposals are "different sides of the same coin" and can be reframed into a constructive negotiation track that advances the Paris Agreement goals.

"The ambition gap is related to trade and to climate finance. If we are to close these gaps, we need more international cooperation. Unilateral measures are not the way," said Tulio Andrade, COP30 Chief Strategy and Alignment Officer and former chief negotiator for Brazil. "Trade can play a key role in scaling up climate action, and climate finance is crucial not only to foster higher ambition but also to accelerate implementation."

Heads of delegation will continue talks through Sunday to try to reach a compromise.

FAA STAFFING CRISIS

Nearly 1,500 Flights Cancelled as Shutdown Deepens Chaos in US

Washington: Severe air traffic control staffing shortages triggered by the ongoing US government shutdown caused major flight disruptions on Saturday, with thousands of delays and cancellations nationwide. The Federal Aviation Administration (FAA) said staffing shortfalls affected 42 airport towers and control centers, delaying flights in at least a dozen major cities including Atlanta, Newark, San Francisco, Chicago and New York. Traffic crossing six high-volume airspace regions was also impacted.

About 1,500 flights were cancelled and 6,000 delayed on Saturday, compared with 1,025 cancellations and 7,000 delays on Friday.

Airline officials said the surge in FAA delay programs has made planning and scheduling extremely difficult, warning that disruptions could worsen if controller attendance continues to drop.


Denver International Airport

The FAA has ordered airlines to reduce flights by 4% at 40 major airports starting Friday due to safety concerns. The shutdown — now in its 39th day — has left thousands of air traffic controllers working without pay and has accelerated absenteeism.

Cuts are set to increase to 6% on Tuesday, and 10% by Nov.14.

On Saturday, the FAA imposed ground delay programs at nine airports. At Atlanta — one of the world's busiest hubs — delays averaged nearly five hours.

The reductions affect roughly 700 daily flights from the four largest U.S. carriers: American, Delta, Southwest and United. Those airlines were forced to cancel additional flights beyond the mandated cuts because of staffing shortages. **Reuters**

Russian Strike Hits Thermal Power Facilities in Ukraine

Kyiv: A large-scale Russian drone and missile attack on Ukraine's energy infrastructure triggered widespread power outages and killed at least four people overnight.

"We have stopped... Zero generation. Zero," state-owned producer Centrenergo said on Facebook, calling it the "most massive strike" on its facilities since Russia's full-scale invasion in February 2022.


Firefighters work at a Kyiv strike site

Centrenergo operates the Trypilska and Zmiivska thermal power plants in the Kyiv and Kharkiv regions. The Trypilska plant — the largest in the Kyiv region — had only recently been repaired after heavy damage from an April 2024 missile attack.

Equipment was also damaged at a thermal power plant owned by DTEK, Ukraine's largest private energy company, it said on Telegram. **Bloomberg**

7 Dead, 13 Rescued After Migrant Boat Sinks Near Malaysia

Kuala Lumpur: Rescuers in Malaysia recovered the bodies of seven migrants from Myanmar and found 13 survivors after a boat carrying dozens capsized near Malaysian waters, officials said Sunday. The vessel had departed from Buthidaung in Myanmar's Rakhine state carrying around 300 people, according to preliminary findings by the Malaysian Maritime Enforcement Agency, said First Adm. Romli Mustafa.

Authorities believe passengers were transferred into three smaller boats as they neared Malaysia. One of the boats is thought to have sunk near Thailand's Tarutao island, with some passengers drifting toward Malaysia's resort island of Langkawi. **AP**

जमीन खरेदीचा दस्त कधी रद्द होणार?

तेजवानी, पाटील यांची उपस्थिती आवश्यक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

मुंढवा येथील सरकारी जमीन खरेदीचा झालेला कथित व्यवहार रद्द करण्याची तयारी अमेडिया एंटरप्रायझेस कंपनीने दाखवली असली तरी हा दस्त रद्द करण्यासाठी या जमिनीचं कुलमुखत्यारधारक शीतल तेजवानी हिला दुय्यम निबंधक कार्यालयात उपस्थित राहावे लागणार आहे. तेजवानी, तसेच अमेडिया कंपनीचे दिग्विजय पाटील यांच्यावर गुन्हा दाखल झाल्याने पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू आहे. अशा परिस्थितीत हे दोघे दुय्यम निबंधक कार्यालयात उपस्थित न राहिल्यास व्यवहार कधी रद्द होणार, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

मुंढवा येथील ४० एकर महार वतनाची जमीन सरकार जमा झाली आहे. या जमिनीच्या मूळ मालकांच्या संमतीने तेजवानी हिने कुलमुखत्यारपत्र तयार केले आहे. त्याआधारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया एंटरप्रायझेस कंपनीने ३०० कोटी रुपयांना ही जमीन खरेदी केली. दुय्यम निबंधक कार्यालयात याबाबतचा व्यवहार झाला असला तरी प्रत्यक्षात ३०० कोटींमधील एक छदामही या दस्ताद्वारे तेजवानी हिला देण्यात आलेला नाही. हा गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर याबाबत पोलिसांत गुन्हा दाखल झाला. त्यानंतर अमेडिया कंपनीने हा व्यवहार रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार या व्यवहाराचा दस्त रद्द (कॅन्सल डीड) करण्यासाठी खरेदीदार आणि विक्री करणारे अशा दोघांना दुय्यम निबंधक कार्यालयात हजर राहावे लागणार आहे. या व्यवहाराच्या दस्तावर पाटील आणि तेजवानी यांच्या सह्या आहेत. दस्त रद्द करण्यासाठी त्यापोटी ४२ कोटी रुपये मुद्रांक शुल्क भरावे लागणार आहेत. मुंढवा येथील ४० एकर जमिनीच्या खरेदी खतावेळी (दस्त नोंदणी) या कंपनीने जागेवर डेटा सेंटर उभारण्यात येणार असल्याचे सांगून जिल्हा उद्योग केंद्राकडून मुद्रांक शुल्कात माफी घेण्यात आली. तसेच दुय्यम निबंधकांनीही दस्तांवरील पाचऐवजी सात टक्के शुल्कमाफी दिली.

...तर १० वर्षे ते जन्मठेपेची शिक्षा

बोपोडी आणि मुंढवा येथील जमीन व्यवहारातील कथित अनियमिततेबाबत खडक पोलिस ठाण्यात नऊ जणांविरोधात व बावधन पोलिस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हे दाखल झाले आहेत. त्यामध्ये कलम ३१६ (५) अंतर्गत लोकसेवक किंवा व्यावसायिकाने पदाचा गैरवापर करून मिळकतीबाबत विश्वासघात केल्याच्या गंभीर गुन्ह्याचा समावेश आहे. हा गुन्हा सिद्ध झाल्यास आरोपींना जन्मठेप किंवा १० वर्षांपर्यंत सक्तमजुरीची शिक्षा व दंड होऊ शकतो. याशिवाय कलम ३१८ (४) नुसार मालमत्ता अथवा रोख्यात फेरबदल करण्यास प्रवृत्त करणाऱ्यांना सात वर्षांपर्यंत सक्तमजुरी व दंड होऊ शकतो.

'मातोश्री'वरील ड्रोनने राजकीय धुरळा

(पान १ वरून)

स्थानकांची नेमकी जागा निश्चित करण्यासाठी ड्रोनद्वारे हे सर्वेक्षण रविवारी करण्यात आले. त्यासाठी पोलिसांची रीतसर परवानगी संबंधित कंपनीने 'एमएमआरडीए'च्या वतीने घेतलेली आहे, असे 'एमएमआरडीए'ने स्पष्ट केल्यानंतर हा गोंधळ दूर झाला.

'पॉड टॅक्सी' सेवेला स्वयंचलित जलद वाहतूक (एआरटीएस) किंवा वैयक्तिक जलद वाहतूक प्रणाली (पीआरटीएस) संबोधले जाते. याअंतर्गत सहा आसनी एका डब्याची टॅक्सी चालकविरहित असेल. ती दर १५ ते ३० सेकंदांनी स्थानकावर येईल. कुर्ला-बीकेसी-वांद्रेदरम्यान एकूण ३८ स्थानके असतील. कमाल वेग ताशी ४० किमी असेल. याअंतर्गत कुर्ला-वांद्रेचे तिकीट सुमारे १०५ रुपये राहण्याची शक्यता आहे.

ड्रोनवरून वादाच्या घिरट्या

'मातोश्री'वर नजर ठेवली जात असल्याचा आरोप

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

आदित्य ठाकरेंनी उपस्थित केले पाच प्रश्न

पोलिसांनी याप्रकरणी दिलेल्या स्पष्टीकरणानंतर शिवसेना उबाठा नेते आणि माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी एक्सवरून प्रशासनावर निशाणा साधला. कोणते सर्वेक्षण घरांमध्ये डोकावण्याची आणि पकडले गेल्यावर तातडीने पळून जाण्याची परवानगी देते? रहिवाशांना याची पूर्वसूचना का दिली नाही? संपूर्ण बीकेसीसाठी एमएमआरडीए फक्त आमच्या घराचे सर्वेक्षण करत आहे का? एमएमआरडीएने त्याऐवजी जमिनीवर उतरून त्यांच्या भ्रष्टाचाराचे एक उदाहरण असलेल्या अटल सेतूसारख्या बनावट कामावर लक्ष केंद्रित करावे. तसेच जर पोलिसांनी परवानगी दिली असेल, तर रहिवाशांना याची माहिती का दिली नाही, असे प्रश्न यावेळी आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानाजवळ रविवारी ड्रोन उडविले जात असल्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने खळबळ उडाली. यावरून शिवसेना उबाठा पक्षाच्या अनेक नेत्यांनी मातोश्रीवर कोण नजर ठेवत आहे, असा संतप्त प्रश्न उपस्थित केला. अखेर मुंबई पोलिसांनी दिलेल्या स्पष्टीकरणामुळे दिवसभराच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या निवासस्थान परिसरात ड्रोन घिरट्या घालत असल्याचा एक व्हिडीओ रविवारी सकाळी समोर आला. ड्रोनचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला. ड्रोनच्या माध्यमातून मातोश्री निवासस्थानावर कोण टेहळणी करतंय का, कुणी पाळत ठेवून आहे का, अशा चर्चा मातोश्री परिसरात सुरू झाल्या. शिवसेना उबाठा नेते आदित्य ठाकरे, अनिल परब, अंबादास दानवे यांच्यासह मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी प्रश्न उपस्थित केले.

मातोश्रीवर ड्रोनने नजर ठेवली जात असल्याचा आरोप झाल्यानंतर खेरवाडी पोलिसांनी या प्रकरणी स्पष्टीकरण दिले आहे. वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी) आणि खेरवाडी येथे ड्रोन उडवले जात आहेत. एमएमआरडीएकडून या भागात सर्वेक्षण केले जात आहे, त्यासाठी हे ड्रोन उडवले जात असल्याचे स्पष्टीकरण पोलिसांकडून देण्यात आले. पोलिसांच्या परवानगीने ड्रोन उडवले जात असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. ८ ते ११ नोव्हेंबरपर्यंत एमएमआरडीएकडून सर्वेक्षण होणार आहे, असेही पोलिसांनी स्पष्ट केले.

'छावा राइड'साठी एसटीची समिती

उपाध्यक्षांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्य ठरवणार कार्यपद्धती

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

राज्य सरकारच्या 'छावा राइड' या ॲपआधारित रिक्षा, टॅक्सी, बस प्रवासी वाहतुकीचे संचालन राज्य परिवहन (एसटी) महामंडळ करणार आहे. राज्य सरकारच्या या ॲपचे नियम आणि कार्यपद्धती ठरवण्यासाठी महामंडळाच्या उपाध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती नेमण्यात आली आहे.

ओला, उबर आणि रॅपिडो अशा ॲप्सआधारित खासगी प्रवासी वाहतूक सेवेच्या धर्तीवर परिवहन विभागानेही ॲपआधारित सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ॲपच्या मदतीने बेरोजगार तरुण-तरुणींना वाहन घेण्यासाठी मुंबै बँकेच्या मदतीने अर्थसाह्य उपलब्ध करून रोजगार देण्यात येणार आहे.

एसटी महामंडळात नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत संचालक मंडळाने 'छावा राइड' ॲपला मंजुरी दिली. या ॲपमध्ये समावेश असणारी नियमावली, कार्यपद्धती, कार्यक्षेत्र आणि वाहन प्रकारांचा समावेश यांच्या निश्चितीसाठी पाच सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, महामंडळ डॉ. माधव कुसेकर यांच्या अध्यक्षतेखाली महाव्यवस्थापक, वाहतूक विभाग, महामंडळ, नितीन मैंद, महाव्यवस्थापक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, तुषार जगताप, महाव्यवस्थापक, नियोजन विभाग, जयेश बामणे, आर्थिक सल्लागार आणि मुख्य लेखा अधिकारी गिरीश देशमुख यांचा या समितीत समावेश आहे. [illegible] सल्लागार म्हणून काम पाहणार आहे. समितीच्या अहवालानुसार ॲपची निर्मिती केली जाणार आहे.

सरकारकडूनही 'ॲप' आधारित रिक्षा-टॅक्सीसेवा

मटा मागोवा

आदिवासींनी साकारलेल्या चित्रांचे प्रदर्शन

मुंबई : राज्यातील आदिवासींनी साकारलेल्या चित्रांचे 'आदि चित्र' या प्रदर्शनाचे उद्घाटन आज, सोमवारी दुपारी २ वाजता होत आहे. जनजातीय गौरव दिनाच्या निमित्ताने आदिवासींचा वारसा जतन करण्याच्या उद्देशाने हे आयोजन करण्यात आले आहे. राज्याचे आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके हे मुख्य अतिथी असतील. आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे व संचालक दीपाली मासिरकर यांची प्रमुख उपस्थिती असेल. प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे कला अकादमीत हा कार्यक्रम होईल. उद्घाटनानंतर हे प्रदर्शन १६ नोव्हेंबरपर्यंत सकाळी ११ ते सायंकाळी ७ खुले असेल.

रेल्वेपुलांच्या कामाला गती

मुंबई : दोन रेल्वे पुलांचे गर्डर हटवणे व दोन पुलांचे गर्डर बसवण्यासाठी शनिवारी कल्याण-बदलापूरदरम्यान मध्यरात्री २.१५ ते ३.४५दरम्यान ९० मिनिटांचा ब्लॉक घोषित करण्यात आला होता. या ब्लॉकमध्ये मुंबई रेल्वे विकास महामंडळाकडून पुलांची कामे पूर्ण करण्यात आली.

'बदलापूर येथील पादचारी पुलाचे गर्डर व अंबरनाथमधील कर्जत दिशेकडील पादचारी पुलाचे गर्डर हटवण्यात आले आहेत. तर, अंबरनाथच्या कल्याण दिशेला नव्या पादचारी पुलासाठी चार गर्डर व एमआरव्हीसी पुलासाठी चार गर्डर उभारण्यात आले', असे एमआरव्हीसीचे मुख्य जनसंपर्क अधिकारी सुनील उदासी यांनी सांगितले.